**जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अमरावती**
**अल्प मूदती निविदा सुचना**
**निविदा क्रं.कक्ष-14/कलि/निविदा/कावि-975/2015 दिनांक 08.05.2015**

राष्ट्रीय मतदार याद्या शुध्दीकरण व प्रमाणिकरण कार्यक्रम-2015 अंतर्गत आधार क्रमांक मतदार यादी डाटाबेसशी जोडणी करणे बाबतचे खालील नमूद कामा करीता निवीदा मागविण्यात येत आहे.

| अक्र | कामाचे वर्णन | कोरी निविदा प्रपत्र किंमत (रुपये) | अनामत रक्कम (रुपये) | सुरक्षा ठेव (रुपये) |
|---|---|---|---|---|
| 1 | भाग-1<br>आधार डाटाबेस मधून आधार क्रमांक शोधणे | रु.500/- (अक्षरी रु.पाचशे फक्त) | रु.10,000/- (अक्षरी रु.दहा हजार फक्त) | रु.1,00,000/- (अक्षरी रु.एक लक्ष फक्त) |
| 2 | भाग-2<br>आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक , ई-मेल आयडी ई.ची ERMS/तत्सम आज्ञावलीमध्ये डाटाएंन्ट्री करणे | | | |

- **कामाचा तपशिल :- भाग-1 --** आधार डाटाबेस मधून आधार क्रमांक शोधणे
  (Searching of Aadhar No. from UID Database)
  **भाग-2** --विविध प्रकारे प्राप्त झालेले आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी ई. ERMS/तत्सम आज्ञावली मध्ये डाटाएंन्ट्री करणे, विविध पोर्टल व्दारे मतदारांनी Feed केलेले आधार क्रमांक ERO मोडयूल व्दारे Approve/Accept करणे.
- **काम पूर्ण करण्याचा अंतिम दिनांक :- 31 जुलै, 2015 पर्यंत**
- **निविदा कार्यक्रम :-**
  निविदा अर्ज **जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती (सामान्य निवडणूक शाखा)** येथून प्राप्त करुन दिनांक 08.5.2015 पासून सकाळी 10.00 वाजतापासून प्राप्त करता येतील. निवीदा अर्ज दिनांक 15.05.2015 रोजी दुपारी 2.00 वाजेपर्यंत उक्त ठिकाणी भरता येतील.
- निविदा सूचना व कागदपत्राचा तपशिल http://www.amravati.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- निविदाधारकाने अनामत रक्कम रु.10,000/- चे Dy.District Election Officer,Amravati यांचे नांवे राष्ट्रीयकृत बॅंकेचे डी.डी. व इतर कागदपत्रे निवेदे सोबत सादर करणे आवश्यक राहील.
- **निविदा उघडण्याचा दिनांक वेळ :-दिनांक 15.05.2015 रोजी सायंकाळी 05.00 वाजता**
  **(स्थळ :- जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती (सामान्य निवडणूक शाखा)**
- निवीदा पुर्व आढावा बैठक दिनांक 15.05.2015 रोजी दुपारी 4.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सामान्य निवडणूक शाखा येथे घेण्यात येईल.
- निविदा पूर्णत: अथवा अंशत: स्विकृत करणे किंवा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार जिल्हा निवडणूक अधिकारी अमरावती यांनी राखून ठेवला आहे.
- निविदेसंबंधी उपरोक्त तारखामध्ये फेरबदल झाल्यास त्यांची सूचना संकेतस्थळावर तसेच कार्यालयाचे नोटीस बोर्ड वर प्रसिध्द करण्यात येईल.
- निविदा मंजूर झाल्यास रु.1,00,000/- लक्ष रकमेची सुरक्षा ठेव, राष्ट्रीयकृत बॅंकेची बॅंक गॅरंटी (कालावधी एक वर्ष) 7 दिवसाचे आंत जमा करावी लागेल.

जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी
अमरावती

**सर्वसाधारण अटी व शर्ती -**

1. निवीदा सूचनेमध्ये नमूद केलेल्या कामाकरीता भाग-1 व भाग-2 मधील कामाकरीता प्रति Entry प्रमाणे स्वतंत्र दर नमूद करावा. दर नमूद करतांना साधन सामुग्री शिवाय व साधन सामुग्री सह असे वेगवेगळे दर नमूद करावे.
2. निवीदा सूचनेमध्ये नमूद केलेले काम हे अमरावती जिल्ह्यातील सर्व 14 तहसिल कार्यालयाचे ठिकाणी करावयाचे असल्यामुळे निवीदा अर्ज-ब (लखोटा-2) मध्ये नमूद केलेले दर हे संपूर्ण अमरावती जिल्हयाकरीता ग्राह्य धरण्यात येईल. त्यानुसार प्रति Entry दर नोंदवावे.
3. निवीदे मधील दर नोंदविण्यापूर्वी कामाचे स्वरुप व व्याप्ती याबाबतची माहिती निवडणूक शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथून करुन घ्यावी.

4. **निविदा बाबत आवश्यक बाबी**

i. सन 2014-2015 अखेरचे सेवाकर भरल्याचे प्रमाणपत्र (मार्च 2015 अखेर भरलेले)
ii. शासकीय कार्यालयामध्ये संगणकीय काम करण्याच्या कामाचा पूर्वानूभव किमान 1 वर्षाचा प्रमाणपत्र (कामाचा कार्यरंभ आदेश, काम पूर्ण व समाधानकारक केल्याबाबतचे प्रमाणपत्र) (Form I)
iii. आयकर विवरणपत्राची (मागील 3 वर्षाचे) प्रमाणित प्रत (2012-13, 2013-14 व 2014-15)
iv. निविदाकाराने मनुष्यबळ व उपलब्ध साधनसामुग्री बाबतीतील From II भरणे आवश्यक आहे.
v. निविदेसोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या व नोंदणी प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती साक्षांकीत केलेल्या असल्या पाहीजे.

5. उपरोक्त कागदपत्रे सादर करण्यात कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
6. लखोटा क्रं.1 च्या अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या निविदाकाराच्या स्पर्धात्मक दराचा लखोटा क्रं. 2 उघडण्यात येईल.
7. अमरावती जिल्हयातील चौदा तहसिल कार्यालयाचे (मतदार मदत केंद्र) ठिकाणी डाटा एन्ट्री करणे करीता कामाची व्याप्ती लक्षात घेता पर्याप्त संख्येने मनुष्यबळ पुरवावे लागेल.
8. पुरविलेल्या मनुष्यबळाला संगणकाचे तसेच मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे.
9. निविदाधारकाने निविदेत कोणत्याही सुचना /अट समाविष्ट केल्यास ती निविदा अपात्र ठरविण्यात येईल.
10. निविदेसंबंधी उपरोक्त तारखामध्ये फेरबदल झाल्यास त्यांची सुचना संकेतस्थळावर तसेच कार्यालयाचे सूचना फलकावर देण्यात येईल.
11. निविदा मंजूर झाल्यास रु.1,00,000/- रक्कमेची राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरेंटी (कालावधी एक वर्ष) 7 दिवसाचे आत जमा करावी लागेल.
12. **निविदाधारकाने निविदा प्रक्रियेचे वेळी वरील प्रमाणे सादर केलेल्या सर्व कागदपत्राच्या मुळ प्रती सोबत आणणे आवश्यक आहे.**
13. निविदेमध्ये भरलेले दर 1 वर्षापर्यंत बंधनकारक राहतील. तसेच एकदा मान्य केलेल्या दरात फेरबदल स्विकारल्या जाणार नाही.
14. वरील काम उपविभागीय अधिकारी/ तहसिलदार यांचे नियत्रंणाखाली त्यांचेकडून प्राप्त झालेल्या सुचनेनूसार ठरवून दिलेले कामकाज दिनांक 31.07.2015 पर्यंत, प्रामाणिकपणे व निपक्षपातीपणे करणे गरजेचे राहील.
15. अभिकर्ता / निविदाधारक कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसावा किंवा कोणत्याही राजकीय पक्षाचा, पुढाऱ्याचा हितचिंतक किंवा पाठीराखा म्हणून ज्ञात नसावा, तसेच त्याच्यावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा पोलीस स्टेशनमध्ये दाखल नसावा. असे असल्याचे निदर्शनास आल्यास कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्यात येईल.
16. निविदाधारकास कोणत्याही प्रकारचा अग्रीम (Advance) दिले जाणार नाही तसेच कोणताही भत्ता दिला जाणार नाही. पुरविलेल्या मनुष्यबळाला द्यावयाचे कोणतेही भत्ते, असल्यास ते देण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची असेल.
17. यशस्वी निविदाधारकास जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे सुचनेनुसार ठरवून दिलेल्या ठिकाणी व ठरवून दिलेल्या संख्येमध्ये मनुष्यबळ पुरविणे बंधनकारक राहील.
18. कंत्राटदार अथवा त्याने पुरविलेल्या मनुष्यबळा कडून कामाबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार येणार नाही याची दक्षता संबंधित कंत्राटदाराने घेणे आवश्यक आहे.
19. कंत्राटदाराने पुरविलेल्या मनुष्यबळास मानधन व इतर भत्ते हे कंत्राटदारांकडून अदा करण्यात येईल.
20. कंत्राटदाराचे काम असमाधानकारक व चुकीचे आढळून आल्यास झालेला करार रद्द करण्यात येईल व अनामत रक्कम व सुरक्षा ठेव शासन खाती जमा करण्यात येईल तसेच देयकाची रक्कम सुध्दा अदा करण्यात येणार नाही.
21. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांना अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता भासल्यास ते कंत्राटदारास मंजूर दरा व अटी शर्तीनुसार उपलब्ध करुन दयावे लागेल.
22. कंत्राटदाराने देयक सादर करताना संबंधित उपविभागीय अधिकारी/तहसिलदार यांचे कडून केलेल्या कामाचे प्रमाणपत्र घेवून सादर करावे लागेल.
23. संगणकाचे परिपूर्ण ज्ञान असणारेच मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. तसेच आवश्यकतेनुसार पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.
24. निविदा मंजूर झालेल्या कंत्राटदारांनी जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, अमरावती जिल्हा यांनी ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यात रुपये 500/- (रु.पाचशे फक्त) च्या स्टॅंपपेपरवर करारनामा करणे आवश्यक आहे.